वाचा:- जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे यांचेकडील परिपत्रक क्र. ना.भू.२/ क्षेत्र दुरूस्ती/ ९९, दिनांक- २८/५/१९९९

---

क्रमांक- ना.भू./प्र.क्र. ७८२१ /ना.भू.४/०८
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख (म.राज्य)पुणे यांचे कार्यालय
नवीन प्रशासकीय इमारत, दुसरा मजला,
विधानभवन समोर, पुणे- ४११ ००१
पुणे, दिनांक- २६/१२/२००८ 26 DEC 2008

परिपत्रक

**विषय- महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १०६ अन्वये क्षेत्र दुरूस्तीबाबत.**

शेती व नगर भूमापन हद्दीतील मिळकतीतील क्षेत्र दुरूस्तीची कार्यवाही महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १०६ अन्वये, तसेच हद्दीची दुरूस्ती कलम १३५ अन्वये जिल्हाधिकारी यांचेकडून केली जाते.

क्षेत्र दुरूस्तीकामी जिल्हाधिकारी / अधीक्षक भूमि अभिलेख यांचेकडे अर्ज प्राप्त झालेवर त्याची प्राथमिक छाननी करून प्रकरण नगर भूमापन अधिकारी / तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांचेकडे आवश्यक तो प्रस्ताव सादर करणेसाठी पाठविले जाते. नगर भूमापन अधिकारी / तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांचेकडून प्राप्त झालेल्या क्षेत्र दुरूस्ती प्रस्तावाची पडताळणी करून प्रस्तावीत क्षेत्र दुरूस्ती योग्य असल्यास अधीक्षक भूमि अभिलेख यांचेकडून मंजूरीसाठी जिल्हाधिकारी यांचेकडे सादर केले जाते. याबाबत इकडील दिनांक २८/५/१९९९ चे परिपत्रकान्वये सविस्तर सूचना दिलेल्या आहेत. त्याचे काटेकोरपणे पालन करावे.

ज्या प्रकरणामध्ये खाजगी जमिन धारक व शासकीय मिळकतीच्या हद्दीमध्ये दुरूस्ती केली जाते अथवा वाद निर्माण होतो अशा प्रकरणामध्ये शासनाची बाजू मांडण्यास काहीवेळा कोणीही नसते अथवा शासनाचे हित जपणेकडे काहीवेळा दुर्लक्ष होते. अशा प्रकरणात क्षेत्र अथवा हद्दी दुरूस्ती करताना कांही वेळा शासनाचे हित जपले जात नाहीत अशा प्रकारच्या तक्रारी शहरी भागात प्राप्त होत आहेत.

कोणतीही कार्यवाही करत असताना शासनाचे हित जपणे हे शासकीय अधिकारी यांचे आद्य कर्तव्य आहे. त्यामुळे शासकीय मिळकतीमधील शासनाचे हिताचे रक्षण करणेच्या दृष्टीने खालीलप्रमाणे सूचना देणेत येत आहेत.

महानगरपालिका / नगरपालिका क्षेत्रातील ज्या क्षेत्र दुरूस्ती प्रकरणामध्ये क्षेत्र दुरूस्ती करताना शासकीय मिळकती बाधीत होत असतील अथवा शासकीय मिळकती लगत असतील

(कृ.मा.प.)

अशा प्रकरणामध्ये महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १०६ अन्वये क्षेत्र दुरूस्तीच्या प्रस्तावाची अधीक्षक भूमि अभिलेख यांनी अभिलेखाच्या आधारे खात्री /पडताळणी करून त्यास उपसंचालक भूमि अभिलेख यांची मान्यता घेवून क्षेत्र दुरूस्तीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करावा.

तसेच महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १३५ अन्वये हद्द दुरूस्तीचे प्रकरणात देखील शासकीय जमिन लगत असल्यास वरील प्रमाणे (महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रापुरते) कार्यवाही करावी. जिल्हाधिकारी यांनी उक्त अधिनियमाच्या कलम १०६ व १३५ अन्वये दुरूस्तीचे आदेश नियमानुसार पारीत करावेत.

स्वाक्षरी XXX
(डॉ. शैलेश कुमार शर्मा)
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे

प्रत- मा. अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी.
प्रत- मा. जिल्हाधिकारी (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीसाठी.
प्रत- उपसंचालक भूमि अभिलेख (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीसाठी.
प्रत- अधीक्षक भूमि अभिलेख (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

"नि र्ग मि त"

20/11/2006
(संभाजी शिंदे)
उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न
जमाबंदी आयुक्त (नागरी भूमापन) पुणे